(इंग्रजी टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

[२०२२] १६ एस. सी. आर. १०९४ ते ११०७

आशुतोष कुमार

विरुद्ध

फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया आणि इतर

(दिवाणी अपील क्रमांक ७७१९/२०२१)

एप्रिल १२, २०२२

[संजय किशन कौल आणि एम. एम. सुंदरेश, न्यायमूर्ती द्वयी)

शिक्षण/शैक्षणिक संस्था : प्रवेश – अपंगत्व – रंग आंधळेपणा (एडिटिंग मधील डिप्लोमा, फिल्म्स आणि टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया – अपीलकर्ता, रंग आंधळ्या व्यक्तीला फिल्म्स अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया, पुणे (एफ. टी. आय. आय.) मध्ये एडिटिंग मधील डिप्लोमाचा अभ्यासक्रम करण्यापासून वगळण्यात आले - या न्यायालयाने यापूर्वी दिलेला आदेश की अपीलकर्त्याला त्याच्या रंगअंधत्वामुळे निवड प्रक्रियेतून पुन्हा नव्याने जावे लागेल -

अपीलकर्त्याने 'रिजनेबल अकोमोडेशन' (काम पारपाडण्यासाठी आवेदकाला काही मदत पुरवणे) या तत्त्वावर विसंबून, न्यायालयाने आपल्या आधीच्या निरीक्षणांचा फेरविचार करण्यासाठी मन वळवण्याचा प्रयत्न केला - विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी रंगअंधत्व या कारणास्तव अपात्रता यावर मत मांडण्यासाठी तज्ञ समिती गठित - रंगअंधत्व असलेल्या व्यक्तींना एफ. टी. आय. आय. द्वारे देण्यात येणाऱ्या 'सर्व अभ्यासक्रमांसाठी' प्रवेश देण्याची आणि सध्याच्या डिप्लोमा इन फिल्म एडिटिंग अभ्यासक्रमातील कलर ग्रेडिंग मॉड्यूल (अभ्यासक्रमातील धडा) एकतर वगळण्यात यावे किंवा ऐच्छिक करावे अशी समितीची शिफारस - समितीचे बहुमत स्वीकारत असे मान्य केले गेले की रंग अंधत्व असलेल्या व्यक्तीना एफ .टी.टी.आय. ने अभ्यासक्रमात सामावून घेणे गरजेचे आहे - सदर निर्देश इतर फिल्म आणि टेलीव्हीजन संस्थांना ही लागू होतील ज्या संस्था समान शैक्षणिक अभ्यासक्रमाचा अवलंब करतात - मात्र काळ पुढे सरकल्यामुळे आणि न्यायालयाने पूर्वीच दिलेला आदेश, या कारणास्तव अपीलकर्त्याला कोणताही दिलासा देता येत नाही.

मकबूल फिदा हुसेन विरुद्ध राजकुमार पांडे आणि इतर (२००८) एस.सी.सी ऑनलाईन दिल्ली ५६२; विकास कुमार विरुद्ध युनियन पब्लिक सर्विस कमिशन आणि इतर, (२०२१) ५ एस.सी.सी ३७०; प्रणय कुमार पोद्दार विरुद्ध त्रिपुरा राज्यशासन आणि इतर, (२०१७) १३ एस सी सी ३५१ : [२०१७] २ एस.सी.आर ७९७ - संदर्भ

संदर्भाधीन केस लॉ (न्यायनिर्णय)

[२०१७] २ एस.सी.आर ७९७ - संदर्भ - परिच्छेद ४०

दिवाणी अपीलीय अधिकार क्षेत्र :

दिवाणी अपील क्रमांक ७७१९/२०२१.

रिट याचिका (सी) क्रमांक १२२९६/२०१६ मधील मुंबई उच्च न्यायालयाच्या दिनांक ०७.०३.२०१७ च्या निर्णय व आदेशा मधुन उद्भवलेले.

कॉलिन गोन्साल्विस, वरिष्ठ वकील ऑलिव्हिया बंग, सत्या मित्रा, एम. शोएब आलम, मो. ओवैस, अपीलकर्ते यांच्यावतीने वकील

ऐश्वर्या भाटी, ए.एस.जी अमित आनंद तिवारी, आशुतोष झा, प्रियांका तेलंग, देवयानी गुप्ता, मंजुळा गुप्ता, ओम प्रकाश शुक्ला, गोपाल झा, मनीषा चावा, सुघोष सुब्रमण्यम, अमरीश कुमार, उत्तरवादी यांच्यावतीने वकील

न्यायालयाचा निर्णय - न्यायमूर्ती संजय किशन कौल यांनी दीला.

१. कला ही गैर अनुरूप स्वरूपाची आहे.

एडगर डेगास यांच्या मार्मिक निरीक्षणाची आपल्याला आठवण होते की "कला म्हणजे आपण जे पाहतो ते नाही, तर आपण इतरांना जे पहायला लावतो ते आहे."

२. उत्तरवादी संस्था ही एक प्रमुख संस्था आहे आणि ती उदार विचार प्रक्रियेला प्रोत्साहन देईल आणि चित्रपटांशी संबंधित अभ्यासक्रमांना त्यांनी कोणत्याही पारंपरिक साचेबंद पणे एखाद्या बंद खोक्यात ठेवू नये अशी अपेक्षा केली जाऊ शकते. या विचारप्रक्रियेमुळेच आम्ही दिनांक ३०.११.२०२१ रोजी रंगअंधत्वाच्या पैलूशी संबंधित आदेश पारित केला. रंगअंधत्व हा अजिबात अंधत्वाचा प्रकार नसून रंगाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनातील कमतरता आहे, हे आम्ही पाहिले होते. या वैद्यकीय स्थितीमुळे निळा आणि पिवळा किंवा लाल आणि हिरवा यासारख्या विशिष्ट रंगांमध्ये फरक करणे कठीण होते आणि अंदाजे आठ टक्के पुरुष लोकसंख्या आणि एक टक्क्यांपेक्षा कमी महिला लोकसंख्येमध्ये लाल आणि हिरव्या रंगातील फरक ओळखण्यात कमतरता असते, हा रंग अंधत्वाचा सर्वात सामान्य प्रकार आहे.

३. आमच्या समोर आलेला दावा हा मूलभूत प्रश्नातून आलेला आहे ज्यात रंगहीन व्यक्तीला फिल्म्स अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया, पुणे (एफ. टी. आय. आय.)/ उत्तरवादी क्र.१ मध्ये डिप्लोमा इन एडिटिंगचा अभ्यासक्रम करण्यापासून वगळले आहे. वरील आदेशात आधीच लक्षात आलेल्या वस्तुस्थितीच्या किंवा त्या तारखेला केलेल्या वकिलांच्या संबंधित युक्तिवादाच्या खोलात जाण्याची गरज नाही. रंगअंधत्व हा अभ्यास क्रमात अडथळा ठरेल की नाही, याचा निर्णय घेण्याऐवजी या विषयावर आणि संबंधित मुद्द्यांवर विचार करण्यासाठी समिती स्थापन करणे आम्हाला योग्य वाटले, असे म्हणावे लागेल. पक्षकारांच्या वकिलांच्या सूचना आणि आमच्या स्वतःच्या शोधकार्यातून, आम्ही खालील समिती स्थापन केली:-

"(i) चित्रपट दिग्दर्शक - श्री रवी के चंद्रन

(ii) रंगकर्मी - स्वप्नील पाटोळे

(iii) पटकथा पर्यवेक्षक - सुश्री शुभा रामचंद्र

(iv) चित्रपट संपादक - श्री अक्किनेनी श्रीकर प्रसाद

(v) अभ्यासक्रम निर्माते / श्री राजशेखरन एचओडी, विभागप्रमुख संकलन

(vi) जिग्नेश तासवाला, ऑपथलमॉलजिस्ट (नेत्र विशेषज्ञ)

(vii) श्री. शोएब आलम, वकील, जे प्रणयकुमार पोद्दार विरुद्ध त्रिपुरा राज्यसरकार (२०१७) १३ एस. सी. सी. ३५१ या खटल्यात यांनी नेमलेल्या समितीत वकील होते

४. आम्ही सुरवातीलाच एक सावधानतेचा इशारा दिला की सहा वर्षाचा काळ लोटला या पार्श्वभूमीवर उत्तरवादीला नव्याने निवड प्रक्रियेच्या कठोरतेतून जावे लागेल, परंतु समितीच्या अहवालाचा विचार करून देण्यात येणाऱ्या आदेशाच्या भवितव्यावर अवलंबून राहून, त्यात भविष्यात रंगांधळेपणा हा अडथळा दूर करण्याची क्षमता होती, जर समितीने असे मत व्यक्त केले तर.

५. ज्या अभ्यासक्रमांसाठी रंगअंधत्व हे अपात्रता मानले जाते त्या सर्व अभ्यासक्रमांमध्ये रंगअंधत्वाच्या पैलूवर मत व्यक्त करण्यासाठी समितीने अधिक व्यापक

अभ्यास करणे देखील आम्हाला योग्य वाटले.

६. समितीचा अहवाल आमच्यासमोर ठेवण्यात आला आहे. त्यावर एफ. टी. आय. आय. चे एडिटिंग विभागप्रमुख के. राजशेखरन वगळता सर्व सदस्यांची स्वाक्षरी आहे, ज्यांच्या काही सूचना होत्या त्यांचा विचार आम्ही समितीचा अहवाल पाहिल्यानंतर करू.

७. समितीने ज्या दोन मुद्द्यांवर समितीचे मत मागवले होते ते खालीलप्रमाणे तयार केले.

i. डिप्लोमा इन एडिटिंगसाठी दिलेला अभ्यासक्रम रंगअंधत्वाने ग्रस्त असलेल्या अपीलकर्त्यास यशस्वीरित्या पूर्ण करता येईल का ?

ii. अधिक व्यापक प्रक्रिया करण्यासाठी, समितीची भूमिका अशी असेल की ज्या अभ्यासक्रमांसाठी रंग अंधत्व हे अपात्रता मानले जाते त्या सर्व अभ्यासक्रमांमध्ये रंगअंधत्वाच्या पैलूवर मत व्यक्त करणे.

समितीच्या चर्चेतील ठळक मुद्दे

८. समितीने सुमारे आठ ऑनलाइन बैठका घेतल्या. प्रमुख आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये रंगहीन व्यक्तींना प्रवेश देण्याच्या प्रचलित पद्धतीची माहिती मिळावी, या हेतूने संस्थेने दहा

आघाडीच्या आंतरराष्ट्रीय चित्रपट व दूरचित्रवाणी संस्थांना पत्र लिहिले, परंतु त्यापैकी केवळ दोन संस्थांकडूनच प्रतिसाद मिळाला. समितीच्या चर्चेदरम्यान असे आढळले की, एफ. टी. आय. आय. मध्ये प्रवेश घेताना त्याच्या रंगअंधत्वाचे स्वरूप आणि व्याप्ती निश्चित करण्यासाठी तज्ञ नेत्ररोगतज्ज्ञांकडून अपीलकर्त्याची तपासणी केली गेली नव्हती. संस्थेच्या जनरल मेडिकल ऑफिसरकडून डोळ्यांची तपासणी करण्यात आली. या पार्श्वभूमीवर या न्यायालयात एक अर्ज दाखल करण्यात आला होता, ज्यावर दिनांक १८.०२.२०२२ रोजी आदेश पारित करण्यात आला ज्यात एम्सच्या (AIIMS) संचालकांना अपीलकर्त्याच्या रंगीत दृश्य दिसण्याच्या कमतरतेचे स्वरूप आणि व्याप्ती निश्चित करण्यासाठी तपासणी करण्यासाठी लवकरात लवकर एक समिती स्थापन करण्याचे निर्देश देण्यात आले होते.

९. दिनांक ०८.०३.२०२२ रोजी तयार करण्यात आलेल्या एम्सच्या अहवालात असे नमूद करण्यात आले आहे की अपीलकर्त्यास "रंग आकलनाच्या ग्रेडिंग पातळीनुसार लाल आणि हिरव्या रंगाच्या दृष्टीची कमतरता होती, उमेदवारास रंग आकलन (सीपी)४" असल्याचे आढळले आहे.

१०. त्यानंतर समितीने सर्व बाबींवर विचार विनिमय करून आपला अहवाल सादर केला आहे. त्यात विविध विभाग आहेत.

११. अहवालाचा पहिला भाग रंगअंधत्वाच्या नेत्रविषयक दृष्टीकोनाशी संबंधित आहे. त्यात चर्चा केली आहे : (ए) रंगअंधत्वाविषयी (बी) रंगअंधत्वाची कारणे (सी) रंगअंधत्वाचे

प्रकार.

१२. अहवालातील (सी) भाग खालीलप्रमाणे पुनरुत्पादित करणे पुरेसे आहे:

"सी. रंग अंधत्वाचे प्रकार

(१) लाल-हिरव्या रंगाचे अंधत्व :

या रंग अंधत्वाच्या सर्वात सामान्य प्रकारात लाल आणि हिरवा यांच्यातील फरक सांगणे कठीण होते. लाल-हिरव्या रंगाच्या अंधत्वाचे ४ प्रकार आहेत:

ड्यूटेरोनोमाली (DEUTERANOMALY) - हा लाल-हिरव्या रंगाच्या अंधत्वाचा सर्वात सामान्य प्रकार आहे. यामुळे हिरवा रंग अधिक लाल दिसतो. हा प्रकार सौम्य आहे आणि सहसा सामान्य क्रियांना यामुळे अडथळा येत नाही.

प्रोटानोमाली (PROTANOMALY) लाल रंग अधिक हिरवा दिसतो आणि कमी चमकदार. हा प्रकार सौम्य आहे आणि सहसा सामान्य क्रियांना अडथळा येत नाही.

प्रोटानोपिया (PROTANOPIA) आणि ड्यूटेरोनोपिया (DEUTERANOPIA) दोन्हीत आपल्याला लाल आणि हिरव्या मधील फरक अजिबात

सांगता येत नाही.

(२) निळा-पिवळा रंग अंधत्व :

या कमी-सामान्य प्रकारच्या रंग अंधत्वामुळे निळा आणि हिरवा आणि पिवळा आणि लाल यांच्यातील फरक सांगणे कठीण होते. निळा-पिवळा रंग अंधत्वाचे २ प्रकार आहेत :

ट्रायटॅनॉमाली (TRITANOMALY) - यामुळे निळा आणि हिरवा आणि पिवळा आणि लाल यांच्यातील फरक सांगणे कठीण होते.

ट्रायटानोपिया (TRITANOPIA) - हे आपल्याला निळा आणि हिरवा, जांभळा आणि लाल, आणि पिवळा आणि गुलाबी यातील फरक सांगण्यास अक्षम बनवते. यामुळे रंग ही कमी चमकदार दिसतात.

(३) पूर्ण रंगअंधत्व :

जर तुम्हाला पूर्ण रंगअंधत्व असेल तर , तुम्हाला रंग अजिबात दिसत नाहीत. याला मोनोक्रोमेसी (monochromacy) देखील म्हणतात आणि हे अगदी असामान्य आहे . यात कुठल्या प्रकारचा अंधत्व आहे यावर अवलंबून, आपल्याला स्पष्टपणे पाहण्यास त्रास होऊ शकतो आणि आपण प्रकाशासाठी अधिक संवेदनशील असू शकता . वेगवेगळ्या प्रकारच्या रंग अंधत्वामुळे वेगवेगळे रंग दिसण्यात अडचणी येतात.

एफ. टी. आय. आय. अभ्यासक्रमाला प्रतिबंध :

१३. त्यानंतर समितीने रंगअंधत्वामुळे प्रतिबंध असलेल्या एफ. टी. आय. आय. अभ्यासक्रमांची तपासणी केली, त्यातील विविध मॉड्यूल्स लक्षात घेऊन रंग अंधत्व असलेल्या उमेदवारांना प्रवेश देण्यासाठी अडथळा ठरू शकणारा अभ्यासक्रम, अशा मॉड्यूलचे महत्त्व आणि व्यावसायिक उपयुक्तता, रंगअंधत्व आणि व्यावसायिकाची व्यावसायिक भूमिका आणि ज्याच्यात सर्जनशील क्षमता आहे अशा रंग अंधत्व असलेल्या उमेदवाराला विशिष्ट टीव्ही /फिल्म मेकिंग कोर्सला प्रवेश नाकारला जावा की नाही हे ठरवण्यासाठी कमीटीने अभ्यास केला.

१४. २०२० एफ. टी. आय. आय. माहितीपुस्तीकेनुसार, रंगहीन व्यक्ती खालील कोर्समध्ये प्रवेश घेण्यास अपात्र आहेत :

(१) सिनेमॅटोग्राफी, (२) इलेक्ट्रॉनिक सिनेमॅटोग्राफी, (३) संपादन (एडिटिंग), (४) व्हिडिओ संपादन (एडिटिंग), (५) कला दिग्दर्शन आणि निर्मिती डिझाइन.

१५. एफ. टी. आय. आय. तर्फे घेण्यात येणाऱ्या सर्व अभ्यासक्रमांसाठी रंगअंधत्व असलेल्या व्यक्तींना प्रवेश देण्यात यावा, असे समितीचे मत आहे. समितीच्या या निष्कर्षात अंतर्भूत असलेले तर्क खालीलप्रमाणे आहेत:

(ए) चित्रपट आणि दूरचित्रवाणी निर्मिती ही सहयोगी कलाकृती आहे. रंग अंधत्व असेलेल्या उमेदवारांना चित्रपट अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश प्रतिबंधित केल्यास सर्जनशील

प्रतिभेचा त्याग होऊ शकतो आणि कलेच्या विकासाला खीळ बसू शकते. वैविध्य आणून समावेशकता ही सर्जनशील कला समृद्ध करते, शैक्षणिक आणि व्यावसायिक जीवनातील कोणत्याही मर्यादा, साहाय्याने किंवा मदतीने दूर केल्या जाऊ शकतात

(बी) चित्रपट/दूरचित्रवाणी व्यावसायिक म्हणून उमेदवारांचे भवितव्य ठरविणे ही एफ. टी. आय. आय. ची भूमिका नाही. जर वाजवी समावेशकता किंवा सहाय्यकाच्या मदतीने उमेदवाराची शिकण्याची मर्यादा दूर करता येत असेल तर उमेदवार एफ. टी. आय. आय. द्वारे देण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी पात्र असावा.

(सी) चित्रपट संपादन म्हणजे सुसंगत अनुक्रमात शॉट्स एकत्र करण्याची कला, तंत्र आणि सराव आहे आणि संपादकाचे काम केवळ चित्रपटाचा तुकडा यांत्रिकरित्या एकत्र ठेवणे, चित्रपटाचे स्लेट कापणे किंवा संवाद दृश्ये संपादित करणे हे इतकेच नाही. चित्रपट संपादकाने कल्पकता बाळगून प्रतिमा, कथा, संवाद, संगीत, पेसींग यावर काम करत त्याचबरोबर कलाकारांचे प्रदर्शन प्रभावीपणे पुनर्कल्पना करत आणि अगदी चित्रपट पुन्हा लिहून एकसंध संपूर्ण तयार करावा लागतो.

चित्रपट संपादन अभ्यासक्रम आणि रंग ग्रेडिंग:

१६. त्यानंतर समितीने पाचव्या सेमिस्टरमध्ये कलर ग्रेडिंगचे २० मिनिटांचे मॉड्यूल

असलेल्या फिल्म एडिटिंग अभ्यासक्रम आणि कलर ग्रेडिंग पैलूची तपासणी केली. प्रोफेशनल फिल्म एडिटरच्या भूमिकेत कलर ग्रेडिंगचा काहीही संबंध नाही, असे मत व्यक्त केले जाते. एक रंग योजनाकार (कलरिस्ट) हा एक विशेष व्यावसायिक कलाकार असतो जो रंग गुणवत्ता सुधारणे आणि रंग दुरुस्ती करतो.

१७) डिजिटल चित्रपटपूर्व काळातील २००० सालापर्यंतच्या भूमिकेच्या ऐतिहासिक दृष्टीकोनाचे विश्लेषण समितीने केले आहे. ब्लॅक अँड व्हाईट रशवर फिल्म एडिटिंग करण्यात येत होते आणि त्यात रंग नंतर जोडण्यात येत होता. त्यामुळे संपादकांना केवळ काळ्या-पांढऱ्या रशेस बाबतीतच संबंध येत असे आणि रंगदृष्टीची गरज भासत नव्हती. अशा प्रकारे एखाद्या व्यक्तीमध्ये रंगअंधत्वाची उपस्थिती असल्यास त्याला तज्ञ फिल्म एडिटर होण्यापासून रोखू शकत नाही.

१८. सिनेमॅटोग्राफर रवी के. चंद्रन यांनी अशी माहिती दिली की, सर रॉजर डीकिन्स सीबीई, एक प्रशंसनीय आंतरराष्ट्रीय सिनेमॅटोग्राफर्सपैकी एक आहेत आणि त्यांनी ऑस्कर पुरस्कार जिंकला आहे शिवाय त्यांच्या सिनेमॅटोग्राफिक कामांसाठी ऑस्कर पुरस्कारांसाठी १३ वेळा नामांकन मिळाले आहे आणि त्यांना नवीन युगातील डिजिटल उपकरणे ऑपरेट करण्यात अडचण आहे, ज्या साठी ते सहाय्यकांवर अवलंबून आहेत. खरे तर श्री चंद्रन यांनी असे मत व्यक्त केले की, जेव्हा ते नवीन युगातील गुंतागुंतीची डिजिटल उपकरणे हाताळताना किंवा त्यात येणाऱ्या समस्या दूर करण्यासाठी, जेव्हा त्यांना गरज पडेल, तेव्हा ते स्वत: सहाय्यक आणि इतर व्यावसायिक माहितगार यांच्या मदतीवर अवलंबून असतात.

१९. एक महत्त्वपूर्ण बाब लक्षात आली ती म्हणजे २०२० एफ. टी. आय. आय. माहितीपुस्तीके मध्ये कोणत्याही विशिष्ट प्रकारच्या किंवा रंग अंधत्वाच्या मर्यादेचा उल्लेख नव्हता जो प्रवेशासाठी अडथळा म्हणून कार्य करू शकतो परंतु असे नमूद केले आहे की रंगअंधत्व/रंग दृष्टीच्या कमतरतेने ग्रस्त असलेले उमेदवार मालिका क्रमांक १,२,५, ६ आणि ७ मध्ये स्पेशलायझेशनसाठी अर्ज करण्यास अपात्र आहेत.

विद्यमान रंग संपादन अभ्यासक्रम

२०. पुढील बाब म्हणजे विद्यमान रंग संपादन (कलर एडिटिंग) अभ्यासक्रम. एफ. टी. आय. आय. चित्रपट संपादन अभ्यासक्रमाचे विश्लेषण केल्यावर असे आढळले की ऍक्रोमॅटोप्सिया, ट्रायटानोपिया, ड्यूटेरानोपिया आणि प्रोटानोपिया या खालील प्रकारचे रंगअंधत्व असलेल्या उमेदवारांना एफ. टी. आय. आय. द्वारे देण्यात येणाऱ्या डिप्लोमा इन फिल्म एडिटिंग अभ्यासक्रमातील विद्यमान २० मिनिटांचे अवरोधक कलर एलिमेंट ग्रेडिंग मॉड्यूल यशस्वीरित्या पूर्ण करण्यात अडचणी येऊ शकतात आणि इतर प्रकारच्या रंगअंधत्व असलेल्या व्यक्तींना विद्यमान अभ्यासक्रम पूर्ण करण्यात कोणतीही अडचण येणार नाही. विशेष लक्षात घेण्यासारखी बाब म्हणजे 'कलर ग्रेडिंग मॉड्यूल'चा चित्रपट संपादकाच्या भूमिकेशी काहीही संबंध नाही, असे मत समितीने व्यक्त केले आहे.

परदेशी चित्रपट संस्थांमधील सर्वोत्तम पद्धती :

२१. समितीने स्वत:चे अधिक चांगले मूल्यमापन करण्यासाठी विविध प्रमुख आंतरराष्ट्रीय चित्रपट संस्थांना पत्र लिहून त्यांच्या सर्वोत्तम पद्धती जाणून घेतल्या. प्रतिसादांच्या आधारे, जरी ते मर्यादित असले तरी, असे आढळले की शारीरिक मर्यादा इत्यादींच्या आधारे कोणताही भेदभाव केला जात नाही आणि एखाद्याला प्रवेश घ्यायचा असल्यास ते डॉक्टरांच्या नोटसह विद्यार्थी व्यवहार कार्यालयाकडे विनंती करतात आणि कोणत्याही वैद्यकीय तपासणीची मग आवश्यकता नसते.

२२. किंबहुना कॅलआर्ट्स यांनी दीलेल्या प्रतिसादात पुढे म्हटले आहे की, "रंग अंधत्व असलेल्या विद्यार्थ्याला त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करता यावा यासाठी सर्व वाजवी व्यवस्था केली जाईल." एफ. टी. आय. आय. ही आंतरराष्ट्रीय ख्यातीची प्रमुख चित्रपट संस्था असल्याने रंगहीन उमेदवारांसाठी एक वाजवी व्यवस्था करून सामावून घेऊन एक आदर्श निर्माण करावा, असे मत समितीने व्यक्त केले. चित्रपट निर्मितीची कला ही एक सहयोगी कला आहे आणि कोणत्याही मर्यादांची भरपाई व्यावसायिकांच्या चमू द्वारे केली जाऊ शकते. त्यामुळे प्रमुख परदेशी संस्थांनी अवलंबिलेला सर्वसमावेशक दृष्टिकोन अशा मताला समर्थन देतो की एफ. टी. आय. आय. नेही रंगअंध व्यक्तींसाठी आपली दारे खुली करावीत.

कृष्ण धवल (ब्लॅक अँड व्हाईट) चित्रपट :

२३. त्यानंतर समितीने कृष्ण धवल चित्रपटांवर चर्चा केली जे चित्र चित्रपटसृष्टीचा अविभाज्य भाग आहे जिथे रंग अंधत्व असलेल्या व्यक्तीला कृष्ण धवल चित्रपट तयार करण्यात कोणताही अडथळा येणार नाही. रंगअंध व्यक्तींना फिल्म स्कूलमध्ये जाण्यापासून न रोखण्याचे हेच एक चांगले कारण असल्याचे मत व्यक्त केले आहे. शिंडलर्स लिस्टसह समीक्षकांचे कौतुक मिळालेल्या ब्लॅक अँड व्हाईट चित्रपटांची उदाहरणे देण्यात आली आहेत.

शारीरिक/संवेदी मर्यादा आणि कला :

२४. चर्चेचा एक मनोरंजक पैलू कलेतील शारीरिक आणि संवेदी मर्यादा या शीर्षकाखाली आहे ज्यात रंगअंधत्वामुळे कोणतीही कमतरता न पाहिलेल्या मोठ्या प्रतिष्ठेच्या व्यक्तींची नावे दर्शवते. आम्ही खालील प्रमाणे येथे नमूद करू इच्छितो :

> "ओ. शारीरिक/संवेदी मर्यादा आणि कला : चित्रपट व्यावसायिक, कलावंत, अभिनेते इत्यादींनी काही वैयक्तिक मर्यादा असूनही आपल्या कामात उत्कृष्ट कामगिरी केल्याची असंख्य उदाहरणे आहेत. खालील उदाहरणे हे विशद करतात :
>
> (i) मधू आंबट, एक अव्वल भारतीय सिनेमॅटोग्राफर (एफ. टी. आय. आय. चे

माजी विद्यार्थी) यांना तीन वेळा सर्वोत्कृष्ट सिनेमॅटोग्राफी साठी राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. त्याने वेगवेगळ्या भाषांतील १०० हून अधिक चित्रपटाचे चित्रीकरण केले आहे. वयाच्या १० व्या वर्षी त्यांना अर्धांगवायूचा झटका आला, ज्याचा परिणाम त्यांच्या वापरातल्या हातावर झाला, परंतु त्यांनी आपल्या मर्यादांवर मात करत शारीरिक अवयव वापरण्याची गरज असलेल्या या कलेत यश मिळवले आहे.

(ii). लॉरेन लॉंग हे एक प्रसिद्ध लेखक चित्रकार आहेत ज्यांनी, रंग अंधत्व असूनही बराक ओबामा यांच्या 'ऑफ दी आय सिंग', या सह असंख्य मुलांच्या पुस्तकांवर काम केले आहे. आर्ट स्कूलमध्ये त्यांनी कलर थिअरी आणि आपल्या अपंगत्वाभोवती काम करण्याचे मार्ग शिकले. तो म्हणतो की त्याच्याकडे मूल्यांची किंवा संपृक्ततेची भावना वाढली आहे जी त्याला मदत करते आणि सहकाऱ्यांच्या आणि कुटुंबाच्या मदतीने तो काम करतो.

(iii) सुधा चंद्रन जिचा पाय काढून टाकला गेला ती भरतनाट्यम नृत्यांगना बनली आहे. जयपूर फूट च्या साहाय्याने सुधा जगभरात परफॉर्म करत गेली आणि तिने असंख्य चित्रपट आणि दूरचित्रवाणी मालिकांमध्ये काम केले आहे.

(iv) प्रणव लाल हा अंध छायाचित्रकार ध्वनीचा वापर करून छायाचित्रे टिपतो.

(v) डेम इव्हलिन ग्लेनी या ग्रॅमी पुरस्कार विजेती स्कॉटिश तालवादकाची

श्रवणशक्ती वयाच्या ८ व्या वर्षी कमी होऊ लागली आणि १२ व्या वर्षी त्या पूर्णपणे कर्णबधिर झाल्या. आपल्या बँड टीचरसोबत मिळून तिने हात, पाय आणि चेहऱ्यावरून संगीताची स्पंदने जाणवण्याचे मार्ग विकसित केले. खऱ्या अर्थाने शरीराच्या उर्वरित भागाच्या मदतीने तिने अक्षरशः स्वत:ला 'ऐकायला' शिकवले.

(vi) हेलन केलर, एक अविस्मरणीय झंझावत आणि इतिहास. तिने हार्वर्डमधील रॅडक्लिफ मधून सर्वोच्च सम्मानाने पदवी घेतली आणि तिने न ऐकलेल्या किंवा न वाचलेल्या भाषेत १२ पुस्तके प्रकाशित केली. ती कर्णबधिर आणि अंध दोन्ही होती.

(vii) रोवन ऍटकिन्सन गंभीर बोलण्याच्या अपंगत्वानेच एक महान अभिनेता बनला, ज्याने मिस्टर बीनला पुढील पिढ्यांसाठी अमर केले.

(viii) इयान ट्रेहर्ने हा कर्णबधिर आणि ९५% अंध आणि फोटोग्राफर आहे. त्याने टोकियो २०२० पॅरा-ऑलिंपिक खेळाडूंची छायाचित्रे काढली. ते चित्रकला करतात, चित्रपट बनवतात आणि संगीत वादक आहे.

२५. कृत्रिम चष्म्याच्या वापर आणि त्याचबरोबर चर्चा केलेल्या इतर दोन बाबी येथे खाली मांडल्या आहेत :

(पी). कोडा : ९४ वा अकादमी पुरस्कार (२०२२)/ऑस्कर पुरस्कार चा सर्वोत्कृष्ट

चित्रपट, सर्वोत्कृष्ट रूपांतरित पटकथा आणि सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेता हे पुरस्कार 'कोडा' (कर्णबधिर प्रौढांची मुले) या चित्रपटाला प्रदान करण्यात आला आहे. या चित्रपटात ऑस्कर आणि बाफ्टा (ब्रिटिश अकादमी ऑफ फिल्म अँड टेलिव्हिजन आर्ट्स) पुरस्कार विजेत्या मार्ली मॅटलिनसह अनेक कर्णबधिर कलाकार आहेत.

(क्यू) <u>प्रोस्थेटिक चष्मा</u>: प्रोस्थेटिक कलर व्हिजन करेक्शन चष्मे, उदाहरणार्थ एनक्रोमा ब्रँड नावाने विकले जाणारे चष्मे, ज्यामुळे रंग अंधत्वाचा प्रभाव कमी होऊ शकतो, असे चष्मे एफ. टी. आय. आय. कडे अर्ज करणाऱ्या रंग अंधत्व असणाऱ्या उमेदवारांना वापरण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे आणि परवानगी दिली पाहिजे, जेणेकरून अशा रंग अंधत्व परिस्थितीचा प्रभाव मर्यादित करण्यासाठी करता येईल.

<u>निष्कर्ष / शिफारशी:</u>

२६. परिच्छेद ४ अन्वये समितीचे निष्कर्ष व शिफारशी पुढीलप्रमाणे :-

IV. निष्कर्ष/शिफारशी

सर्व संबंधित मुद्द्यांची तपासणी व चर्चा करून समिती कडे पाठविलेल्या संदर्भांच्या अनुषंगाने समिती खालील निष्कर्ष/शिफारशी करते.

(a) न्यायालयाचा संदर्भ # १: " डिप्लोमा इन एडिटिंगसाठी दिलेला अभ्यासक्रम रंगअंधत्वाने ग्रस्त असलेल्या अपीलकर्त्यास यशस्वीरित्या पूर्ण करता येईल का?"

समितीच्या शिफारशी : एम्स मेडिकल बोर्डाच्या अहवालानुसार लाल आणि हिरव्या रंगाच्या दृष्टीची कमतरता असलेल्या आणि सीपी ४ ची रंगधारणा असलेल्या आशुतोष कुमार यांना एफ. टी. आय. आय. द्वारे घेण्यात येणाऱ्या डिप्लोमा इन फिल्म अँड एडिटिंग अभ्यासक्रमाचा विद्यमान अभ्यासक्रम पूर्ण करण्यात अडचण येईल. विशेषत: चित्रपट संपादन अभ्यासक्रमाचा भाग असलेल्या वीस मिनिटांच्या 'कलर ग्रेडिंग मॉड्यूल'मुळे हि अडचण आहे. तथापि, कलर ग्रेडिंग मॉड्यूल चा फिल्म एडिटिंग कोर्स किंवा फिल्म एडिटरच्या प्रोफेशनल भूमिकेशी कोणताही संबंध नाही (एफ. टी. आय. आय. चे एचओडी एडिटिंग श्री. के. राजशेखरन याना कलर ग्रेडिंग मॉड्यूल फिल्म एडिटिंग कोर्ससाठी अप्रासंगिक आहे हे मान्य नाही).

(b) न्यायालयाचा संदर्भ # २ : "अधिक व्यापक प्रक्रिया सुलभ करण्यासाठी, समितीची भूमिका अशी असावी की ज्या अभ्यासक्रमांसाठी अपात्रता मानली जाते त्या सर्व अभ्यासक्रमांमध्ये रंग अंधत्वाच्या बाबीवर त्यांनी मत व्यक्त करावे."

समितीच्या शिफारशी : समितीचे असे मत आहे की :

(i) रंग अंधत्व असलेल्या व्यक्तींना एफ. टी. आय. आय. द्वारे देण्यात

येणाऱ्या सर्व अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेण्याची परवानगी देण्यात यावी, अशी शिफारस करण्यात आली आहे. रंग अंधत्व असलेल्या व्यक्तींसाठी एफ. टी. आय. आय. मध्ये प्रवेशास मर्यादा नसाव्या. शैक्षणिक आणि व्यावसायिक जीवनात सहाय्यकाकडून कोणतीही मर्यादा दूर करता येते.

(ii) एफ. टी. आय. आय. ने त्यांच्या सर्व अभ्यासक्रमांमध्ये रंगअंधत्व असलेल्या उमेदवारांसाठी वाजवी दृष्ट्या समावेशन करून घेतले पाहिजे, जिथे रंगहीन व्यक्तींच्या प्रवेशास बंदी आहे. उदाहरणार्थ, ज्या अनिवार्य क्रेडिट गुण असलेल्या मोड्यूल मध्ये गहन रंग विवेचन (इंटेन्सिव्ह कलर अँप्रेसिएशन) करण्याची गरज आहे, त्या कोअर क्रेडिटसाठी अभ्यासक्रमात निवड / वैकल्पिक मॉड्यूल प्रदान करून किंवा इतर कुठल्याही प्रकारे तसे करता येईल.

(iii) सध्याच्या डिप्लोमा इन फिल्म एडिटिंग कोर्स अभ्यासक्रमातील कलर ग्रेडिंग मॉड्यूल एकतर वगळण्यात यावे किंवा ऐच्छिक केले जावे, ज्यामुळे रंग अंधत्व असलेल्या व्यक्तींसाठी प्रवेशाची घातलेली मर्यादा उठविली जाईल.

२७. वरील निष्कर्षांवरून स्पष्ट पणे दिसून येते की रंगअंधत्व असलेल्या सर्व व्यक्तींना एफ. टी. आय. आय. द्वारे प्रदान केल्या जाणाऱ्या सर्व अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेण्याची परवानगी

दिली पाहिजे कारण कोणत्याही मर्यादेवर मात केली जाऊ शकते. एफ. टी. आय. आय. ने रंगअंधत्व असलेल्या उमेदवारांसाठी त्यांच्या अभ्यासक्रमात स्थान द्यावे आणि सध्याच्या डिप्लोमा इन फिल्म एडिटिंग अभ्यासक्रमातील कलर ग्रेडिंग मॉड्यूलचा २० मिनिटांचा अडथळा आणणारा घटक वगळावा किंवा ऐच्छिक करावा.

२८. समितीने एक सावधानपत्र वगळता सर्व बाबींचा विचार करून एकत्रितपणे मत मांडण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचे आपण कौतुक केले पाहिजे. के. राजशेखरन यांच्या लक्षात आल्याप्रमाणे हा इशारा आहे. आता आपण त्या सावधान पत्राकडे वळूया.

२९. एफ. टी. आय. आय. ची भूमिका सर्वसमावेशक शिक्षण देण्याची असल्याने कलरग्रेडिंग मॉड्यूल चित्रपट संपादन अभ्यासक्रमासाठी अप्रासंगिक आहे हे राजशेखरन यांना मान्य नाही. हा अभ्यासक्रम तज्ज्ञांनी तयार केला असून त्याला अॅकॅडेमिक कौन्सिल आणि गव्हर्निंग कौन्सिलने मान्यता दिली असून कलर ग्रेडिंग मॉड्यूलच्या अप्रासंगिकतेच्या बाजूने मत देणे म्हणजे मर्यादा ओलांडणे ठरेल आणि अत्यंत विचारपूर्वक हा अभ्यासक्रम तयार करणाऱ्या तज्ज्ञांच्या ज्ञानालाही आव्हान देणारे ठरेल, असे मत त्यांनी व्यक्त केले आहे. हा अभ्यासक्रम २०१५ मध्ये तयार करण्यात आला होता. सात वर्षे उलटून गेली. श्री. राजशेखरन यांच्या संकोचामुळे असे दिसते की, त्यांना संस्थेतील व्यवस्था बिघडवायला आवडणार नाही.

३०. सिनेमॅटोग्राफी, आर्ट प्रॉडक्शन आणि डिझाईनच्या रंग अंधत्व असलेल्या विद्यार्थ्यांना तज्ज्ञांनी काळजीपूर्वक आणि विचारपूर्वक तयार केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे

पुन्हा या अभ्यासक्रमांअंतर्गत अभ्यास करणे अवघड जाईल, यावर त्यांनी भर देण्याचा प्रयत्न केला आहे.

३१. विशेष म्हणजे त्यांचे अंतिम मत असे आहे की , "जेथे शक्य असेल तिथे एफ. टी. आय. आय. ने एकूण ११ पैकी तब्बल ०५ अभ्यासक्रमांमध्ये रंग अंधांना सामावून घेतले आहे"

३२. त्यामुळे त्यांचे मत हे तसेच किंवा जैसे थे ठेवावे. एफ. टी. आय. आय. ला चांगले माहित आहे, आणि त्यांच्या तज्ञांना चांगले ज्ञान आहे. या न्यायालयाने स्थापन केलेल्या तज्ज्ञ पॅनेलची एक असहमती वगळता बाकी सर्व जण त्यांच्या निर्णयावर एकमत असूनही यामध्ये हात घालू नये असा त्यांचा रोख आहे.

३३. आदरपूर्वक नमूद करण्यात येते की हा अभ्यासक्रम आम्हाला मान्य वाटत नाही.

३४. समितीचा अहवाल हा यावर आधारित आहे की कला आणि संस्कृतीचे कौतुक, नावीन्यपूर्णता, अंतर्ज्ञानीपणा, अडथळ्यांपासून अनिर्बंध अशा गोष्टींवर ज्यावर मदतीने मात करता येते असाच आहे.

३५. आम्ही समितीच्या बहुमताशी अंतःकरणापासून सहमत आहोत आणि म्हणूनच असं मत व्यक्त करतो की एफ. टी. आय. आय. ने आपल्या अभ्यासक्रमात ते स्वीकारावे. यामुळे एफ. टी. आय. आय. च्या स्वातंत्र्यावर गदा येते, असे आम्हाला वाटत नाही, कि जे उत्तरवादीच्या अभ्यासू वकिलांनी सांगण्याचा प्रयत्न केला आहे, उलट एफ. टी. आय. आय. ला या क्षेत्रातील

सर्वात अग्रगण्य वाटा उचलण्यासाठी आणखी व्यापक पार्श्वभूमी आता मिळाली आहे. महान छायाचित्रकार अँन्सेल अँडम्स यांनी एकदा म्हटल्याप्रमाणे, "तुम्ही केवळ कॅमेऱ्याने फोटो काढू नका. आपण पाहिलेली सर्व चित्रे, वाचलेली पुस्तके, ऐकलेले संगीत, आवडलेली माणसं सगळे छायाचित्रणाच्या कृतीत आणा. असाच शैक्षणिक अभ्यासक्रम राबविणाऱ्या इतर संस्था असतील, तर त्यांनीही समितीच्या निष्कर्षाप्रमाणे या विषयावरील चर्चेचे पालन करणे आवश्यक आहे, असे आमचे मत आहे.

३६. संपूर्ण कोर्समधील अभ्यासक्रमात विशिष्ट मॉड्यूल हे २० मिनिटांचे मॉड्यूल असल्याने, आमच्या लक्षात येत आहे की छोट्याश्या गोष्टीला फार महत्व दिले आहे आणि समितीनेही ते मोड्यूल ऐच्छिक केले जाऊ शकते असे मत व्यक्त केले आहे.

३७. काळ पुढे सरकल्यामुळे आणि आमचा आधीच आदेश दुर्दैवाने, आम्हाला अपीलकर्त्याला दिलासा देण्याची मुभा देत नाही, परंतु तशा प्रकारचे बदल भविष्यात इतरांसाठी घडतील ते पाहणारा जणूकाही हा विद्यार्थी त्याच्यासाठीचा ध्वजवाहक आणि परिवर्तन आणणारा नेता ठरावा.

३८. हे आम्हाला असे दिसते की हा 'नो जॅम टुडे' प्रकार आहे म्हणजेच आज काही फळ चाखायला मिळणार नाही. समाजात बरेचदा असे घडते की काही व्यक्तींनी एक अग्रगण्य भूमिका बजावलेली असते ज्यांना त्याचा त्वरित थेट लाभ मिळू शकत नाही किंवा कष्टाने मिळवलेलं फलीत त्यांना चाखायला मिळतच नाही, असो.

३९. आम्ही स्वीकारलेला हा समितीचा अहवाल आणि निर्णय कलाप्रकारांच्या कौतुकाच्या व्यापक स्वरूपात आणखी पुढे घोडदौड करेल. एवढीच आपण आशा करू शकतो. आपण ॲरिस्टॉटलचे स्मरण केले तर बरे होईल, जेव्हा त्याने म्हटले होते की "कलेचे उद्दीष्ट वस्तूंचे बाह्य स्वरूप नव्हे, तर त्यांचे आंतरिक महत्त्व दर्शविणे हेच आहे." कलेच्या आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या संदर्भात बनवलेले असले, तरी मकबूल फिदा हुसेन विरुद्ध राजकुमार पांडे आणि इतर या खटल्यात आमच्यापैकी एकाने (न्या. माननीय संजय किशन कौल) यांनी केलेली निरीक्षणे पुनरुत्पादित करणे येथे योग्य ठरेल.(२००८ एससीसी ऑन लाईन दिल्ली ५६२) :

> ११४. “मानवी व्यक्तिमत्व पूर्णपणे बहरले जाऊ शकते आणि मानवतावादही खोलवर रुजून त्याचे पुनरज्जीवन घडू शकते परंतु त्याला असे वातावरण हवे कि जिथे सर्वजणच सहिष्णुतेची वृत्ती आणि संयमाची भावना दर्शवितात."

४०. आम्ही वरील आदेशासह कार्यवाही बंद केली असती परंतु अपीलकर्त्याच्या अभ्यासू वकिलांनी आम्हाला दिनांक ३०.११.२०२१ च्या आदेशात केलेल्या आमच्या निरीक्षणांचा पुनर्विचार करण्यास राजी करण्याचा प्रयत्न केला आहे ज्यात आम्ही असे मत व्यक्त केले होते की अपीलकर्त्याला या प्रक्रियेतून पुन्हा नव्याने जावे लागेल. विद्वान वकिलाचा युक्तिवाद विकास कुमार विरुद्ध संघ लोकसेवा आयोग आणि इतर [१] आणि प्रणय कुमार पोद्दार विरुद्ध त्रिपुरा राज्य आणि इतर [२] मध्ये सांगितल्याप्रमाणे "रीजनेबल ऍकोमोडेशन" या तत्त्वावर आधारित आहे. आणि ते असा युक्तिवाद करतात की न्यायालयाने भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद १४२ अन्वये

अधिकार क्षेत्राचा वापर करणाऱ्या उमेदवारास अभिनव पद्धतीने प्रवेश दिला.

४१. ते असा युक्तिवाद करतात की अपीलकर्त्याने सुमारे सहा महिने अभ्यासक्रमाचा अभ्यास केला होता आणि हा अडथळा येईपर्यंत तो वैद्यकीयदृष्ट्या तंदुरुस्त होता. अभ्यासक्रमाची विद्यार्थी संख्या एक ने वाढवून पुढील शैक्षणिक वर्षात उमेदवाराला सामावून घ्यावे, असे ते सुचवतात.

४२. मात्र, असे करण्यापूर्वी संस्थेचे मत जाणून घेतले पाहिजे, जे यासंदर्भात उत्तर दाखल करतील आणि तोडगा काढण्याचा प्रयत्न करतील. विनंतीनुसार दोन आठवड्यांत उत्तर दाखल करावे.

४३. त्यानंतर आठवडाभरात याबाबत प्रत्युत्तर (रिजॉईन्डर) दाखल करण्यात यावे.

पुढील कार्यवाहीसाठी दिनांक १०.०५.२०२२ रोजी बोर्डवर घ्यावे.

निधी जैन आणि अमरेंद्र कुमार निर्देश जारी केले.

(सहाय्य : अजय, एलसीआरए)

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x

१ (२०२१) ५ एस. सी. सी. ३७०

२ (२०१७) १३ एस. सी. सी. ३५१